| MHND010001572023 | विशेष खटला क्र.८/२०२३<br>महाराष्ट्र शासन<br>विरुध्द<br>लक्ष्मण मेटकर व इतर<br><br>- |
|---|---|

निशाणी क्र.३ खाली आदेश
दिनांक ०८ नोव्हेंबर २०२३

प्रस्तुतचा अर्ज अर्जदार/तक्रारदार नामे प्रमोद शंकरराव शेट्टी यांनी कलम ४५१ फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ अन्वये अर्जासोबत परिशिष्ट-A मध्ये नमूद केल्याप्रमाणे सोन्याचे दागिने, रोख रक्कम इत्यादी हे गु.र.क्र.२१६/२०२२ पोलीस ठाणे, हदगांव जि. नांदेड यांच्याकडून परत मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे. प्रस्तुत अर्जातील अर्जदाराचे कथन असे की, अर्जदार हे व्यावसायिक आहे, अर्जासोबत परिशिष्ट-A मध्ये नमूद केलेल्या सोन्याचे दागिने, रोख रक्कम इत्यादीचे ते मालक आहे, सदरील सोन्याचे दागिने, रोख रक्कम हे गु.र.क्र.२१६/२०२२ पोलीस ठाणे हदगाव मधील तपासादरम्यान जप्त करण्यात आले होते, ते पुढे असेही कथन करतात की त्यांना सदरील सोन्याचे दागिने, रोख रक्कम इत्यादींची आता गरज आहे. करिता, वरील प्रमाणे सोन्याचे दागिने, रोख रक्कम अर्जदाराला प्रस्तुत खटल्याचा निकाल लागेपर्यंत तात्पूरत्या स्वरूपात देण्यात यावे.

२. आरोपींच्या वतीने त्यांचे विद्वान विधीज्ञ श्री.आर.जी.परळकर यांनी अर्जावर त्यांचे म्हणणे सादर केले की, प्रस्तुत अर्जदाराने त्याच्या अर्जामध्ये मागणी केलेल्या सोन्याचे दागिने, रोख रक्कम इत्यादीचे मालकी हक्क दर्शविणारे कोणतेही कागदपत्र दाखल केलेले नाही त्यामुळे अर्ज नामंजूर होण्यास पात्र आहे. तपासी अंमलदार यांनी निशाणी क्र.५ नूसार आपले म्हणणे सादर केले आहे. त्यांनी त्यांच्या म्हणणे मध्ये अर्जदारास नमूद सोन्याचे दागिने, रोख रक्कम अटीवर परत देण्यास काहीएक हरकत नसल्याचे सांगितले आहे.

३. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, प्रस्तुत खटल्यात जप्त करण्यात आलेले सोन्याचे दागिने, रोख रक्कम इत्यादी प्रस्तुत गुन्हयामध्ये चोरलेले दागिने व रोख रक्कम आहेत जे की पोलीसांनी तपासादरम्यान जप्त केले व त्याच्या मालकीबाबत पोलीसांनी कोणतीही हरकत घेतलेली नाही. सदरील सोन्याचे दागिने, रोख रक्कम इत्यादी पोलीस ठाण्यात ठेऊन कोणताही उद्देश साध्य होणार नाही. आरोपींनी सदरच्या वस्तु हया त्यांच्या असल्याबाबत कोणतेही कथन केलेले नाही. सबब, प्रस्तुत खटल्याच्या संपरिक्षेदरम्यान अर्जदाराने त्याच्या अर्जासोबत परिशिष्ट-A मध्ये मागणी केल्याप्रमाणे सोन्याचे दागिने, रोख रक्कम मिळण्यास तो पात्र आहे. करिता, खालील प्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

## आदेश

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | अर्ज निशाणी क्र.३ मंजूर करण्यात येतो. | | | |
| २ | जप्त मुद्देमाल सोन्याचे दागिने, रोख रक्कम ज्यांचे वर्णन खालीलप्रमाणेः- | | | |
| | अ.क्र. | तपशील | वजन | नग |
| | १ | सोन्याचे गोल रवा | ४० ग्रा. ५० मिली | ०१ |
| | २ | लहान व मोठया अंगठया | १७ ग्रा. ३६० मिली | ०६ |
| | ३ | गळ्यातील सोन्याचे चैन | ७ ग्रा. ५३ मिली | ०१ |
| | ४ | पोहा चैन सोन्याचा तुकडा | ६ ग्राम | ०१ |
| | ५ | लक्ष्मीहार सोन्याचा तुकडा | ५ ग्राम १६० मिली | ०१ |
| | ६ | लहान व मोठे दोन मंगळसुत्र व एकुण लहान मोठे ९ सोन्याची मणी | ४ ग्रा. २७० मिली | ०१ |
| | ७ | सोन्याचे गंठणाचा तुकडा काळया मण्यासह | ७ ग्रा. २४० मिली | ०१ |
| | ८ | सोन्याच्या बांगड्या व पाटलीचा तुकडा | ९ ग्राम ५०० मिली | ०३ |
| | ९ | गळयातील चैन सोन्याचा तुकडा | ६ ग्राम ५७० मिली | ०१ |
| | १० | हारातील सोन्याचे पेंडाल व हाराचे तुकडे | २७ ग्राम १३० मिली | ०३ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | ११ | सोन्याची चैन | १५ ग्रा.५५० मिली | ०१ |
| | १२ | सोन्याची चैन व तुकडा | ५ ग्रा. ९९० मिली | ०१ |
| | १३ | सोन्याचे लक्ष्मी हाराची टिकली | ४ ग्राम ५०० मिली | ०४ |
| | १४ | सोन्याची चैन | १३ ग्रा. ३३० मिली | ०१ |
| | १५ | सोन्याचे मोहन माळ काळ्या मण्यासह | ५८ ग्राम ३१० मिली | ०१ |
| | १६ | सोन्याचे चैनचा तुकडा | ५ ग्राम ९६० मिली | ०१ |
| | १७ | सोन्याचे नेकलेसचा तुकडा चैन खड्यासह | १७ ग्रा १३० मिली | ०१ |
| | १८ | सोन्याच्या अंगठया खडयासह | १३ ग्रा. ४०० मिली | ०३ |
| | १९ | सोन्याचे मंगळसुत्र खडया व मण्यासह | २ ग्रा. ८५० मिली | ०१ |
| | २० | सोन्याचे कंगणाचे तुकडे | ६ ग्रा. १६० मिली | ०२ |
| | २१ | सोन्याचे पोतीचा तुकडा काळया मण्यासह | ७ ग्रा. २४० मिली | ०१ |
| | २२ | सोन्याचे लटकन जोड | २ ग्रा. ९७० मिली | ०१ |
| | २३ | सोन्याचे लटकन | २ ग्रा. ५०० मिली | ०१ |
| | २४ | सोन्याचे मोठे २७ मणी व दोन छोटे मणी | ४ ग्रा. २८ मिली | २९ |
| | २५ | नगदी रोख | रुपये १९,०००/- | ०१ |
| | | एकुण किंमत | रु.१५,२२,२६४/- | |
| ३. | वरील प्रमाणे गु.र.क्र.२१६/२०२२ कलम ३९४, ४५२, ५०६ भा.दंवि. पोलीस ठाणे हदगाव जि. नांदेड मध्ये जप्त करण्यात आलेले सोन्याचे दागिने व रोख रक्कम सुपूर्दनामा अर्जदार प्रमोद शंकरराव शेट्टी , रा. बसवेश्वर चौक, हदगांव, जि. नांदेड यांचे नावे करून १६ लाख रुपये इतक्या रकमेच्या क्षतीपूर्ती बंधपत्रावर (Indemnity bond) खालील अटीवर देण्यात यावे.<br><br>१. अर्जदाराने किंवा त्याचे वतीने इतर कोणीही पुढील आदेशा होईपर्यंत वरील सोन्याचे दागिन्याचे स्वरूप व रंग बदलणार नाही. | | | |

| | |
|---|---|
| | २. अर्जदार वरील नमूद सोन्याचे दागिने व रोख रक्कम न्यायालयात किंवा पोलीस ठाण्यात न्यायालय किंवा तपासी अधिकारी यांनी वेळोवेळी आदेश निर्गमीत केल्यास हजर करेल.<br><br>३. अर्जदार हा वरील नमूद सोन्याचे दागिने व रोख रक्कम इत्यादीस कोणतीही क्षती पोहचू देणार नाही.<br><br>४. न्यायालयाच्या पुढील आदेश होईपर्यंत अर्जदार वरील नमूद सोन्याचे दागिने व रोख रक्कमाची देणगी, विक्री, भेट इत्यादी मार्गाने विल्हेवाट लावणार नाही. |
| ४. | क्षतीपूर्ती बंधपत्र (Indemnity bond) पोलीसासमक्ष सादर करण्यात यावे. |
| ५. | संबंधित तपासी अधिकारी पोलीस ठाणे हदगांव जि. नांदेड यांना निर्देशीत करण्यात येते की त्यांनी वरील नमूद सोन्याचे दागिने व रोख रक्कम यांचे छायाचीत्रे काढावी व सविस्तर पंचनामा दोन पंचासमक्ष तयार करून न्यायालयात दाखल करावा. |

स्वाक्षरित

दिनांक :- ८ नोव्हेंबर २०२३

**(चं.वि.मराठे)**
अतिरीक्त सत्र न्यायाधीश-२, नांदेड.

I affirm that the contents of this P.D.F. file order are same word to word, as per the original order.

1. Name of the Stenographer:- Mr. V.G.Dandare, Steno (L.Grade)

2. Court Name :- Court of District Judge-2 and Addl.Sessions Judge, Nanded

3. Date of order :- 08/11/2023
4. Order signed by the Presiding Officer on :- 08/11/2023

5. Order uploaded on :- 09/11/2023